REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशिल माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख १२ जून, १९४० अंक २४

S. P. MANDALI'S

## SCHOOL OF COMMERCE

(Estd., 1933)

*Near Gokhale Hall,*

*POONA, 2.*

The Premier House of Business Education in the Presidency; The only Recognised Institution in Poona preparing students for **Government** Diploma and Certificates in Commerce. One year's Ideal Course in Accountancy, Banking, Commerce and Finance, Correspondence, Type writing etc.

New session from 24th June 1940; Matriculation minimum qualification for admission; Admission limited; Last date 15th July; Apply for Prospectus:

Office Hours: 8 to 11 a. m.

SUPERINTENDENT.

फर्म, कंपनी, सोसायटी

## कायदा

लेखक : श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, बी. ए. (ऑनर्स), एलएल. बी.

"न्यायबोध" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला आतां पुस्तकरूपानें तयार झाली. फर्म, कंपनी, सोसायटी यांच्या कायद्यासंबंधीं विवेचन या पुस्तकांत केलेलें आहे. हें विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें पुस्तक संग्रहीं ठेवणें अवश्य आहे. ट.ख. सह किंमत ०६ आण्यांचीं तिकिटें पाठवा.

मॅनेजर : सेंट्रल लॉ हाउस,
मुळशीपागरोड :: नागपूर शहर

## आयुर्वेद महाविद्यालय, पुणें

नवीन वर्षाचे वर्ग गुरुवार ता. २० पासून सुरू होतील.

कोणत्याही विद्यापीठाची प्रवेश परीक्षा (Matriculation) संस्कृत व इंग्रजी हे विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांस प्रवेश मिळेल. मुंबई सरकारच्या देशी वैद्यक बोर्डानें मान्य केल्याप्रमाणें अभ्यासक्रम ५ वर्षांचा. प्रत्यक्ष शिक्षणाच्या सोयी खालीलप्रमाणें आहेत.

१. पदार्थविज्ञान, रसायन व इंद्रिय-विज्ञान यांचे प्रत्यक्ष शिक्षणाकरितां **प्रयोगशाळा.**

२. शरीर (Anatomy) या विषयाचे प्रत्यक्ष शिक्षणाकरितां **शवविच्छेदनशाला व शारीर वस्तुसंग्रह (Museum).**

३. औषधी तयार करण्याचे प्रत्यक्ष शिक्षणाकरितां **रसशाळा पुणें, लि.** हा औषधांचा कारखाना.

४. रोगनिदान व चिकित्सा (काय व शल्य) यांचे प्रत्यक्ष शिक्षणाकरतां ६५ रहात्या रोग्यांची व उत्तम शस्त्रकर्म मंदिराची सोय असलेलें प्रसिद्ध **ताराचंद रामनाथ धर्मार्थ आयुर्वेदीय हॉस्पिटल.**

५. प्रसूति तंत्राच्या शिक्षणाकरितां १२ सूतिकेची सोय असलेलें **स्वतंत्र प्रसूति गृह.**

६. याशिवाय हॉस्पिटलला जोडून **क्ष किरणशाखा** (X Ray Dept.) **संप्राप्ति विज्ञान शाला** (Pathologic Laboratory) यांची सोय केली आहे.

फी, अभ्यासक्रम, प्रवेश अर्ज वगैरे सविस्तर माहितीसाठीं दीड आण्यांचीं तिकिटें पाठवून माहितीपत्रक मागवावें. मर्यादित विद्यार्थ्यांची वसतिगृहाची सोय केलेली आहे. प्रथम वर्षांत मर्यादित संख्या गुणानुसार घेणें असल्यानें प्रवेशेच्छु विद्यार्थ्यांनीं छापील नमुन्यावर शक्य तो लवकर अर्ज करावेत. प्रवेश अर्ज ता. ५ जूनपासून २० जूनपर्यंत महाविद्यालयाचे कचेरीचे वेळीं, घेण्यांत येतील.

पत्ताः—**आयुर्वेदीय महाविद्यालय ११ निहाल पेठ, पुणें.**

वा. चिं. लागू,
अधिपति.

# विविध माहिती

### हिंदी साखर इंग्लंडमध्यें खपण्याचा संभव

हिंदी साखरेचा साठा वाढलेला आहे आणि ग्रेटब्रिटनला साम्राज्यांतील देशांतून साखर घेणें आहे. तेव्हां हिंदुस्थानची साखर ब्रिटिश सरकारनें घेतली पाहिजे अशी सूचना हिंदी कारखानदारांनीं केली होती ती मान्य होण्याचा बराच संभव आहे असें म्हणतात.

### साखरपरिषद् आणि साखरसमितीची सभा

स्वदेशी साखरेच्या सद्यःपरिस्थितीविषयींच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठीं प्रांतिक सरकारांचे व कारखान्यांचे प्रतिनिधि ह्यांची परिषद् सिमला येथें येत्या १४ तारखेस भरणार आहे. दक्षिणेंतील कारखानदारांचे प्रतिनिधि म्हणून श्री. लालचंद हिराचंद निवडण्यांत आले आहेत. साखरेच्या धंद्याचे सुधारणेविषयींच्या निरनिराळ्या प्रश्नांची चर्चा करण्यासाठी इंपिरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या साखरसमितीच्या सभा सिमल्यांत १७,१८ व १९ जूनला व्हावयाच्या असून प्रो. काळे दक्षिणेंतील कारखान्यांचे प्रतिनिधि म्हणून त्यांस उपस्थित होणार आहेत.

### हिंदुस्थानसरकारची नवी कर्जयोजना

तीन प्रकारांचीं कर्जें हिंदुस्थानसरकारानें काढलीं आहेत, त्यांचे संबंधांत तज्ज्ञांचे अनुकूल अभिप्राय प्रसिद्ध झाले आहेत. सामान्य आर्थिक स्थितींतल्या लोकांस ह्या कर्जांत पैसा घालणें सोयींचें होणार असल्याचें प्रो. काळे ह्यांचें मत टाइम्स ऑफ इंडियानें प्रसिद्ध केलें आहे.

### अमेरिकेंत सावधगिरीचें धोरण

परदेशांतून येणाऱ्या लोकांवर सक्त नजर ठेवण्याविषयींचे त्रावढीचे नियम अमेरिकन सरकारनें प्रसिद्ध केले आहेत. विशिष्ट परिस्थितींत असल्या लोकांस अमेरिकेंत येण्याचा प्रतिबंध करण्यांत आला आहे. युरोपांतील घडामोडींच्या अनुभवावरून ही दक्षता बाळगण्यांत येत आहे.

### आगगाडीचीं स्वदेशी इंजनें

आगगाडीचीं विशिष्ट नमुन्याचीं इंजनें तयार करण्यास प्रत्येकीं ९८ हजार रुपये खर्च येईल. त्याच तऱ्हेच्या परदेशांतून येणाऱ्या इंजनांपेक्षा हा आकडा २० टक्के कमी आहे.

### ट्रेझरी बिलांवर द. सा. द. शे. १ रु. १ आ. ८ पै. व्याज

गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारच्या २ कोटि रुपये किंमतीच्या ट्रेझरी बिलांची विक्री झाली. व्याजाचा सरासरीचा दर द. सा. द. शे. १ रु. १ आ. ८ पै. इतका बसला.

### रेडिओच्या सामानाची आयात वाढली

चालू वर्षाच्या एप्रिल महिन्यांत रेडिओच्या सामानाची हिंदुस्थानांत फार मोठ्या प्रमाणांत आयात झाली. तिच्यावरील जकातीचें उत्पन्न ह्या महिन्यांत ११ लक्ष, ९० हजार रुपये झालें. १९३९ च्या एप्रिल महिन्यांत हें उत्पन्न १ लक्ष, २५ हजार रुपये इतकेंच झालें होतें.

### सुधारलेल्या जातींच्या कपाशीची लागवड

उंच जातींच्या कपाशीच्या लागवडीस मुंबई प्रांतांत उत्तेजन देण्यांत येत आहे आणि हें क्षेत्र हळुहळू वाढत आहे. वरील जातींच्या पिकांपासून शेतकऱ्यांस अधिक फायदा मिळत असल्याचा अनुभव येत आहे.

### कामकरीवर्गाच्या रहाणीचा खर्च

मे २५ तारखेस पुऱ्या झालेल्या महिन्यांत मुंबई शहरांतील कामकरीवर्गाच्या रहाणीचा सरासरीचा खर्च ह्यापूर्वीच्या महिन्याचे मानानें एक टक्क्यापेक्षा थोड्या कमीनें वाढला. एप्रिल महिन्यांत अहमदाबाद् येथील मजुरांच्या रहाणीबाबत कांहीं बदल झाला नाहीं. सोलापुरांत थोडीशी घट झाली.

### रत्नागिरी जिल्ह्यांत ग्रामसुधारणेची प्रगति

रत्नागिरीच्या जिल्हा ग्रामसुधारणासमितीच्या विद्यमानें ग्रामसुधारणेच्या कार्यांत प्रगति होत आहे. खेडेगावी रस्ते, बंधारे, आरोग्य ह्यांसंबंधांत विधायक कार्य चाललें असून त्याविषयीं मुंबईसरकारनें समाधान व्यक्त केलें आहे. ह्या बाबतींत नुकताच एक सप्ताह साजरा करण्यांत आला. प्रस्तुत कार्याच्या खर्चास रत्नागिरी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेनें ५० रुपयांची मदत दिली.

### विमानें बनवण्याचे हिंदुस्थानांत कारखाने

विमानें बनवण्याचे कारखाने हिंदुस्थानांत काढण्याच्या प्रश्नाचा विचार सरकार करीत आहे. विमानें आणि वैमानिक तयार करण्याकडे तें लक्ष पुरवीत आहे.

### दोस्तराष्ट्रांस अमेरिकेची मदत

अमेरिकन विमानें दोस्तराष्ट्रांच्या सहायार्थ युरोपमध्यें येऊं लागलीं आहेत. बंदुका व दारूगोळा ह्यांचा त्यांस असाच पुरवठा होणार आहे.

### ग्रामसुधारणा सहायक

मुंबई सरकारनें खेडेगावांच्या सुधारणेसाठी योजना केली आहे तीमध्यें ह्या कामास लायक असे सहायक शिकवून तयार करण्याची एक बाब आहे. पुणें व नगर ह्या जिल्ह्यांतील १८ ते ३५ वर्षें वयाचे उमेदवार मांजरी व धुळें येथें चालवण्यांत यावयाच्या वर्गांत घेतले जातील आणि निवडलेल्या लोकांस एक वर्षभर महिना २० रुपये दिले जातील.

### स्वदेशी साखरेच्या धंद्याची चौकशी

स्वदेशी साखरेच्या धंद्यास आज संरक्षण मिळत आहे, त्याची व्यवस्था ह्यापुढें कशी असावी ह्या प्रश्नाची चौकशी टारिफ बोर्डाकडे सोपवण्याची युक्तायुक्तता इंपीरिअल कौंसिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या सल्लागार समिति पुढें चालू महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत सिमला येथें चर्चेसाठी येणार आहे.

### कॅनडामध्यें चिलखती गाड्यांचें उत्पादन

ग्रेटब्रिटनच्या उपयोगासाठी कॅनडामध्यें २०० चिलखती गाड्या बांधण्याचें काम चालू झालें आहे.

### जी. आय. पी. रेल्वेचें उत्पन्न

गेल्या एप्रिल आणि मे महिन्यांत जी. आय. पी. रेल्वेस २ कोटि ८१ लक्ष रुपये उत्पन्न झालें. गेल्या वर्षाच्या ह्या दोन महिन्यांपेक्षा हा आकडा ३१ लक्ष रुपयांनीं मोठा आहे.

### बेल्जमकडे निर्यात बंद

हिंदुस्थानांतून बेल्जमकडे माल निर्गत करण्यास बंदी करण्यांत आली आहे.

### मध्यवर्ती असेंब्लीची मुदत वाढली

मध्यवर्ती असेंब्लीची मुदत आणखी एका वर्षानें म्हणजे १ ऑक्टोबर, १९४१ पर्यंत वाढविण्यांत आली आहे.

### मॅट्रिक परीक्षेचा निकाल

मुंबई विश्वविद्यालयाच्या गेल्या मॅट्रिकचे परीक्षेस २३,१७८ विद्यार्थी बसले, त्यांपैकी ११,२४१ उत्तीर्ण झाले. म्हणजे ४९% विद्यार्थी पास झाले.

## अनुक्रमणिका

पृष्ठ
१ विविध माहिती ... २७८
२ हिंदी चलनाचें आसन मक्कम आहे ... २७९
३ राष्ट्रक्षणाच्या खर्चासाठी कर्जरूपानें द्रव्य २८०
४ स्फुट विचार ... २८१
मि. चार्चेल ह्यांचें भाषण—युद्धसहाय्याविषयीं व्हाइसरॉय यांची योजना—युद्धाप्रीत्यर्थ सर्व उत्पादक सामर्थ्यांचा उपयोग–धान्याच्या हिंदी व्यापाऱ्यांची सरकारकडे तक्रार—घाबरटपणा करूं नका—कॉमनवेल्थ कंपनीची साधारण सभा—मराठा चेंबर बँकिंगच्या कायद्याचा विचार करणार
५ हिंदी बँकांचा योजिलेला कायदा २८३
६ ब्रिटिश हुंडणावळ... २८४
७ पुण्यांतील उद्योगदिन २८६
८ निवडक बाजारभाव २८७

अर्थ

बुधवार, ता. १२ जून, १९४०

## हिंदी चलनाचें आसन मक्कम आहे

युद्धाच्या धामधुमीच्या काळांत अडाणी व भाबड्या जनतेच्या डोळ्यांत धूळ फेकून स्वतःचा फायदा करून घेण्यास धूर्त लोकांस चांगलेंच फावतें. एरव्ही समंजसपणानें वागणाऱ्या कित्येकांचीहि दिशाभूल होऊन ते खोट्या बातम्या व भ्रामक कल्पना ह्यांस बळी पडतात. ह्यासंबंधानें सावधगिरीची सूचना आम्ही गेल्या अंकांत दिलीच आहे. गेल्या महायुद्धाचे वेळीं लोकांची फसगत ह्या रीतीनें होऊन त्यांचें नुकसान झाल्याच्या उदाहरणांवरून जनतेनें बोध घेणें अगत्याचें आहे. कागदी चलन किंवा चलनी नोटा ह्यांचे संबंधांत धामधुमीच्या व गप्पांच्या काळांत गैरसमज अडाणी व घाबरट लोकांत प्रथम पसरतो. चलनी नोट हा नुसता कागदाचा तुकडा आहे आणि त्याची भरीव किंमत आपणांस वेळेस मिळेल न मिळेल असा संदेह कांहीं जणांच्या मनांत येतो. त्याचा फायदा धूर्त लोक घेतात आणि नोटांच्या वास्तविक किंमतीपेक्षा कमी रकमेंत त्याचा विनिमय करून मधल्यामध्यें फायदा लुबाडतात. अशीं उदाहरणें मागच्या महायुद्धांत घडलीं आहेत. ह्या धूर्त लोकांस हें माहीत असतें कीं चलनाच्या कचेरींत चलनी नोटा नेऊन दिल्या असतां त्यांचा मोबदला रोकड रुपये निर्विवाद मिळूं शकतात. अडाणी व भोळसट लोकांस ह्याची माहिती नसते आणि ते बट्टा देऊन नोटांची कमी रोकड स्वीकारतात. कागदाच्या नोटा रुपयां इतक्याच भरीव आहेत ही गोष्ट सामान्य जनतेस पटली पाहिजे आणि पटवून दिली पाहिजे. गेल्या कांहीं वर्षांत चलनी नोटांचा प्रसार हिंदी जनतेंत झपाट्यानें झालेला आहे आणि रोजच्या व्यवहारांत त्यांचा रुपयांइतकाच निश्चित उपयोग होतो हा अनुभव आतां सार्वत्रिक झाला आहे. नोटा वापरणें रुपयांपेक्षा अधिक सोयीचें असतें आणि समाजांत आर्थिक ज्ञान व आधुनिक पद्धतीचे व्यवहार ह्यांची वाढ जसजशी होते तसतशा त्या अधिकाधिक खेळतात. युद्धपरिस्थितींत शंका व भीति ह्यांनीं लोक पछाडले जातात आणि चलनी नोटा बाळगण्यास ते कचरतात.

चलनी नोटांच्या मोबदल्यांत रोकड रुपये देण्यास सरकार बांधलेलें आहे ही गोष्ट त्यांच्या सुरक्षितपणाचा मक्कम पुरावाच आहे. नोटा आणि रुपये हीं दोन्ही देवघेवीचीं साधनें आहेत आणि त्यांचें कार्य एकच आहे. देण्या-घेण्यांत दोहोंचा सारखाच उपयोग होतो आणि दोन्ही "पैसा" च होत. कित्येक देशांत नोटांच्या बदली नाणीं देण्यास तेथील सरकार स्वतःस बांधून घेत नाहीं आणि तरीहि नोटा निर्वेधपणानें व्यवहारांत खेळतात. किंबहुना, चांदी-सोन्याची बचत करण्याचे हेतूनेंच चलनी नोटांचा पैसा समाजांत खेळवला जातो. हिंदुस्थानांतील चलनी नोटांची व्यवस्था ह्याहून अगदीं निराळी आहे. चलनी नोटांचे मोबदल्यांत रोकड रुपये देण्यास सरकार बांधलें गेलें आहे. एवढेंच नव्हें, तर ह्या संबंधांतली आपली जबाबदारी नीट पार पाडतां यावी म्हणून त्यानें स्वतंत्र निधी संग्रहीं ठेवला आहे चलनी नोटांची व्यवस्था आतां रिझर्व्ह बँकेकडे देण्यांत आली आहे आणि त्या बँकेवर कायद्यानें वरील जबाबदारी टाकली आहे. बँकेनेंहि चलनी नोटांच्या निधीची भरपूर तरतूद केली आहे. असें असून देशाच्या कांहीं भागांत रुपयाच्या नाण्यांना मळती मागणी येऊं लागली आहे आणि सेव्हिंग बँकेंतल्या ठेवी काढून घेण्याची प्रवृत्ति दृष्टोत्पत्तीस येत आहे. हा केवळ अज्ञानाचा आणि घाबरटपणाचा परिणाम आहे. ह्यास्तव हिंदी चलनी नोटांच्या मजबुतीविषयीं माहिती देणें आणि जनतेची त्यांचे बाबतींत खातरजमा करणें अगत्याचें आहे.

ह्या विषयींची परिस्थिति अशी आहे. आज सुमारें २५० कोटि रुपये किंमतीच्या चलनी नोटा काढलेल्या आहेत. ह्यापैकीं प्रत्येक नोटेचा मोबदला रुपयांत मिळण्याची व्यवस्था आहे आणि त्यासाठीं भरभक्कम निधी बाजूस काढून ठेवण्यांत आला आहे. ह्या निधीचा महत्त्वाचा भाग त्यांत असलेलें ४४ कोटि रुपयांचें सोनें हा होय. चलनी नोटांच्या हिशेबांत ही सोन्याची किंमत जुन्या भावानें म्हणजे सोनें २४ रुपयांस तोळा होता, तेव्हांच्या दरानें दाखविण्यांत आलेली आहे. वस्तुतः अलीकडच्या बाजार भावानें ही किंमत वरील आकड्याच्या दुप्पट होईल. चलन निधीमध्यें १२० कोटि रुपये किंमतीचे स्टर्लिंगमधले रोखे आहेत. रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत सोनें आणि स्टर्लिंगमधलें रोखे किती असले पाहिजेत ह्या विषयींची मर्यादा दाखल केलेली आहे, (आणि ती सुरक्षिततेच्या दृष्टीनें केलेली आहे) तिच्या मानानें चलन निधीचा हा भाग किती तरी अधिक आहे. हिंदी चलनाची परराष्ट्रीय चलनांतली किंमत म्हणजे हुंडणावळीचा दर स्थिर रहावा एवढ्यासाठीं सोनें आणि लंडनमध्यें तेथील चलनांतले रोखे संग्रहीं ठेवावे लागतात. ह्या दृष्टीनें पहातां हिंदी नोटांस व रुपयांस अंतर्गत व बहिर्गत व्यवहारांत वाटेल तेवढी मजबुती आहे. सोनें आणि स्टर्लिंगमधले रोखे मिळून नोटांच्या एकूण तारणाच्या निदान दोन पंचमांश इतकी म्हणजे ४० टक्के एवढी रकम झाली पाहिजे असा कायद्याचा निर्बंध आहे. परंतु वरील आकड्यांची बेरीज सुमारे ६५ टक्के होते ह्यावरून चलन निधी किती बळकट आहे ह्याची कल्पना येईल. आजच्या स्थितींत निधीचा प्रस्तुत भाग जरूरीपेक्षा अधिकच आहे. निधीचा तिसरा भाग रुपयाच्या नाण्यांचा आहे आणि रिझर्व्ह बँकेजवळ ५० कोटि रुपये आहेत आणि ह्याशिवाय तिचेपाशीं ४० कोटि रुपयांचे रुपयांतले रोखे आहेत. गेलीं कांहीं वर्षें व्यवहारांत रुपयांस मागणी कमी झाल्याकारणानें ते बँकेकडे मोठ्या प्रमाणांत

परत येत आणि कायद्यास अनुसरून एका वर्षांत पांच कोटि ते हिंदुस्थान सरकारास स्वीकारावे लागत. चालू वर्षी ह्या रीतीनें रुपये परत देण्याचें कारण पडलें नाहीं. वरील माहितिवरून ही गोष्ट स्पष्ट होईल कीं प्रत्येक चलनी नोटेस सोनें रौप्यांत, ज्यांचें सहज परिवर्तन होऊं शकेल असे ब्रिटिश व हिंदी रोखे आणि रुपयांचें भरपूर नाणें ह्यांचा पुरेपूर आधार आहे. नोटांच्या बदला रुपये देण्याची सरकारची केव्हांहि तयारी आहे. परंतु रुपये जवळ बाळगणें सुरक्षित नाहीं हें विसरतां कामा नये आणि नोटांचा रोकडींत बदला करण्यांत कांहीं सोय किंवा फायदा नाहीं. काल्पनिक भीतीमुळें नोटांचे रुपयें करण्यानें निष्कारण अविश्वासाचें वातावरण पसरतें आणि त्यापासून व्यक्तीचें व राष्ट्राचें अनहित होण्याचा संभव आहे हें सर्वांनीं ध्यानांत बाळगावें.

चलनी नोटांच्या हिशेबाची परिस्थिति कशा प्रकारची आहे हें स्पष्ट डोळ्यांत भरावें म्हणून त्याचा रिझर्व्ह बँकेनें अगदीं अलीकडे प्रसिद्ध केलेला तक्ता आम्हीं खालीं देत आहों:—

**नोटांचा विभाग**

देणें — रु.

नोटा (अ) बँकिंग विभागांतील
८,४९,९४,००० रु.

(ब) व्यवहारांत खेळत्या हिंदुस्थानांत आणि ब्रह्मदेशांत मिळून
२,४८,५२,७०,००० रु.

एकूण देणें २,५७,०२,६४,००० रु.

येणें — रु.

(अ) सोनें, नाणीं व पाटले
हिंदुस्थानांत
४०,५४,४८,००० रु.
हिंदुस्थानाबाहेर
२,८६,९८,००० रु.
पौंडांतले (स्टर्लिंग रोखे)
१,२३,५०,११,०००, रु.

(अ) ची बेरीज १६७,९१,५७,०००

| | |
|---|---|
| (ब) रुपये | ४६,५६,९७,००० |
| हिंदुस्थान सरकारचे रोखे | ४२,५४,१०,००० |
| हिंदुस्थानांतल्या हुंड्या व इतर पत पत्रिका | ......... |

एकूण येणें २,५७,०२,६४,०००

### दी ट्रस्ट ऑफ इंडिया स्टाफ असोसिएशन

या कंपनीच्या नोकरवर्गातर्फे "दी ट्रस्ट ऑफ इंडिया स्टॉफ असोसिएशन" सदर कंपनीच्या ५ व्या वाढदिवशीं (ता. ४ जून १९४० रोजीं) स्थापन करण्यांत आली आहे. सदर संस्थेचा उद्देश परस्पर सहकार्य व कंपनीच्या सर्वांगीण उन्नतीस पोषक अशा विधायक योजना अमलांत आणणें असा आहे.

### राष्ट्ररक्षणाच्या खर्चासाठी कर्जरूपानें हातभार

युद्धपरिस्थितीमुळें हिंदुस्थानांत लढाऊ बळ वाढवणें आवश्यक आहे असें वाटून सरकारनें एक लाखानें फौज वाढवण्याचें आणि हिंदी विमानी दळ चौपट करण्याचें ठरवलें आहे. ह्या संबंधांतलें सरकारचें धोरण काय आहे ह्याचा खुलासा सर सेनापतींनीं नुकताच केला. सैन्याच्या सर्व शाखांमध्यें सुधारलेल्या शस्त्रास्त्रांची तरतूद होणार असून हिंदी लोकांची मोठ्या प्रमाणावर भरती केली जावयाची आहे. लष्करी अधिकाऱ्यांच्या जागा हिंदी उमेदवारांस दिल्या जातील. सर्व बाजूंनीं लष्करी तयारींत जो हा विस्तार व्हावयाचा आहे, त्यास किती खर्च येईल ह्याचा अंदाज करणें कठीण आहे. तथापि, सध्याचे कर त्यांत वाढ करूनहि तो भागवण्यास अपुरे होतील ह्या जाणीवेनें सरकारनें कर्जाच्या मार्गानें जरूर असलेला पैसा उभा करण्याचें ठरवलें. लोकांस आपला पैसा सुरक्षितपणानें कर्जांत गुंतवण्याची संधि मिळून सरकारास युद्धखर्चाचे बाबतींत सहाय दिल्याचें श्रेयहि प्राप्त होणार आहे. काढण्यांत आलेलें कर्ज तीन प्रकारांचें आहे. (१) दहा वर्षे मुदतीचीं डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकेट्स हा त्यांतला पहिला प्रकार आहे. तीं प्रत्येकी दहा, दहा रुपयांचीं आहेत आणि त्यांस पांच हजार रुपयांची व्यक्तिगत मर्यादा आहे. पहिल्या वर्षाचे नंतर प्रत्येक वर्षाचे अखेर प्रत्येक १० रुपयांस ५ आणे व्याज दिलें जाईल. पांचव्या वर्षाचे शेवटीं ४ आणे आणि दहा वर्षांचे अखेर ८ आणे ह्याप्रमाणें बोनसची भर त्यांत घातली जाईल. ह्या हिशेबानें १० रुपयांचें दहा वर्षांत १३ रु. ९ आणे होतील आणि चक्रवाढ व्याजानें व्याजाचा दर ३½ टक्के पडेल. हें कर्ज करमाफ आहे. ज्यांत कॅशसर्टिफिकिटांचा व्यवहार चालतो अशा सर्व पोस्टऑफिसांमध्यें गेल्या ६ तारखेपासून सेव्हिंग्ज सर्टिफिकिटांचे पैसे स्वीकारण्यास प्रारंभ झाला आहे. (२) इंडियन डिफेन्स बॉन्ड्स हे दुसऱ्या प्रकारच्या कर्जाचे रोखे आहेत. त्यांची मुदत ६ वर्षांची आहे आणि त्यांवरील व्याजाचा दर ३ टक्के आहे. कर्जफेडीचे वेळीं १ टक्का बोनस देण्यांत येईल. शंभर आणि शंभराच्या पटींमध्यें हें कर्ज देतां येईल आणि त्याची व्यक्तिविषयक मर्यादा पंधरा हजार रुपये आहे. रिझर्व्ह बँकेच्या कचेऱ्या, इंपिरिअल बँकेच्या शाखा व सरकारी तिजोऱ्या येथें ह्या कर्जरोख्यांचा व्यवहार होईल. (३) तीन वर्षे मुदतीचे बिनव्याजाचे रोखे हा कर्जाचा तिसरा प्रकार आहे. पन्नास रुपयांच्या वरच्या रकमा ह्या रोख्यांकरितां वरील ठिकाणीं स्वीकारल्या जातील. हा बिनव्याजी कर्जाचा प्रकार अगदीं अभिनव असा आहे. व्याज घेणें हें कित्येकांच्या धार्मिक भावनांच्या विरुद्ध आहे आणि अशा लोकांनीं आपले पैसे सरकारनें कर्जाऊ घ्यावे अशी सूचना केल्यावरून ह्या मार्गानें कर्ज काढण्यांत येत आहे. वरील तीन्ही प्रकारचे कर्जरोखे केव्हांहि विकत घेतां येतील, त्यांस कालमर्यादा घालण्यांत आलेली नाहीं. लोकांनीं आपल्या बचतीचा उपयोग रोखे विकत घेण्याकडे सोयीप्रमाणें करावा हा येथें सरकारचा हेतु आहे.

### रोम येथें १९४२ मध्यें प्रदर्शन भरत नाहीं

रोम मध्यें १९४२ सालीं आंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरवण्याचें ठरलें होतें. युद्धपरिस्थितीमुळें ही योजना पुढें ढकलण्यांत आली आहे.

## स्फुट विचार

### मि. चर्चिल ह्यांचें भाषण

ब्रिटिश मुख्य प्रधान, मि. चर्चिल, ह्यांनीं कॉमन्स सभेमध्यें युद्धपरिस्थितीवर झगझगित प्रकाश टाकणारें भाषण केलें, तें नमुनेदार होतें असें म्हणावयास हरकत नाहीं. दोस्तराष्ट्रांच्या फौजा फ्लँडर्समधून निसटून इंग्लंडला व्यवस्थितपणानें परत आल्या, ह्या पराक्रमाचें भरपूर श्रेय त्यांनीं सैनिकांच्या शौर्यास आणि वैमानिकांच्या धडाडीस दिलें. त्याचप्रमाणें ज्या सेनानींनीं शत्रूशीं लढत लढत त्याच्या हातून आपल्या फौजोंची सुटका केली आणि ज्या आरमारी व इतर लोकांनीं वहातुकीचें अवघड कार्य यशस्वी रीतीनें पार पाडलें त्यांचीहि योग्य स्तुति त्यांनीं केली, परंतु त्याचबरोबर, फ्लँडर्समध्यें दोस्तराष्ट्रांचें नुकसान झालें आणि त्यांस माघार घेण्याचा प्रसंग आला ह्याविषयींहि त्यांनीं निर्भीडपणाचे उद्गार काढले. ब्रिटिश जनतेस वस्तुस्थिति स्पष्ट कळावी आणि त्यांनीं उत्साहानें शत्रूचा पूर्ण पाडाव होईतोंपर्यंत आपली पराकाष्ठा करावी ह्या हेतूनें मि. चर्चिल ह्यांनीं स्पष्टोक्तीचा अवलंब केला. त्यांच्या भाषणासंबंधानें ब्रिटिश वृत्तपत्रांनीं काढलेले उद्गार आणि त्याचा अमेरिकेवर झालेला परिणाम ह्यांकडे लक्ष दिलें असतां मि. चर्चिल ह्यांनीं केलेलें सत्यकथन अत्यंत आवश्यक आणि योग्य असेंच होतें ह्याविषयीं दुमत होणार नाहीं. सर्व प्रकारचा स्वार्थत्याग करून हिटलरशाहीचा नायनाट होईतों लढण्याचा निश्चय त्यांच्या भाषणांत असंदिग्ध रीतीनें व्यक्त झाला असून त्याचे योगानें ब्रिटिश लोकांस नवीन स्फुरण चढल्यावांचून रहाणार नाहीं. ह्यापुढचा प्रसंग अत्यंत आणीबाणीचा आहे ही गोष्ट त्यांनीं स्पष्ट करून सांगितली आहे. इटलीच्या धोरणानें तर परिस्थिति गंभीर करून टाकली आहे आणि हिटलरनें दोस्तराष्ट्रांचा नाश करण्याचा चंग बांधला आहे. मि. चर्चिल ह्यांचें भाषण ह्या सर्व बाबी संकलित रीतीनें लक्षांत घेतां यथाकाल आणि यथोचित झालें असे सर्वत्र उद्गार निघत आहेत ते पूर्णपणानें यथार्थ आहेत.

---

### युद्धसहायाविषयीं व्हाइसरॉय ह्यांची योजना

जर्मनीनें सध्या युरोपांत जी चढाई चालविली आहे तिचे घोर परिणाम सर्व जगास भोगावे लागणार असल्याची जाणीव अमेरिकेंतहि आतां तीव्रतेनें होत असून दोस्तराष्ट्रांस शक्य तेवढें सहाय देण्याची तेथें तयारी केली जात आहे. अमेरिकेंतील ब्रिटिश प्रतिनिधि, लॉर्ड लोथिअन, ह्यांनीं अमेरिकेच्या सहायाचें रहस्य व महत्त्व काय आहे हें नुकतेंच स्पष्ट करून सांगितलें. हिंदुस्थानांतील लोकमत असंदिग्धपणानें मागेंच व्यक्त झालें आहे आणि त्या संबंधांत सर्व जनतेची एकवाक्यता आहे. जर्मनीविरुद्ध चाललेल्या युद्धांत दोस्तराष्ट्रांस पूर्ण विजय मिळावा ह्या दृष्टीनें त्यांस ह्या देशांतून सैनिक व लढाऊ सामुग्री पुरवण्यांत येत आहे. ही मदत अधिक विस्तृत प्रमाणांत दिली जाण्याचें अगत्य सध्या युरोपांत उद्भवलेल्या आणीबाणीच्या परिस्थितीनें सिद्ध केलें आहे. हिंदी सर सेनापतींनीं हिंदुस्थानचें सहकार्य अधिक मोठ्या प्रमाणांत दोस्त राष्ट्रांस पोहोचावें ह्या हेतूनें कोणत्या योजना हातीं घेण्यांत आल्या आहेत ह्याचें वर्णन नुकतेंच जाहीर रीतीनें केलें. सैन्यभरतींत आणि युद्धसामुग्रीच्या उत्पादनांत वाढ करण्याचें ठरलें आहे; ह्यापेक्षाहि अधिक विस्तृत प्रमाणांत व जास्त त्वरेनें प्रयत्न झाला पाहिजे असें हिंदी लोकमत आहे. हा प्रश्न दोस्तराष्ट्रांच्या मदतीचा आहे तसाच तो हिंदुस्थानच्या संरक्षणाचाहि आहे. व्हाइसरॉय, लॉर्ड लिनलिथगो, ह्यांनीं सर्व देशभर प्रत्येक जिल्ह्यांत युद्धसहायक समित्या नेमण्यासंबंधानें योजना सुचवली आहे, तीहि हिंदुस्थानच्या स्वसंरक्षणाचा प्रयत्न संघटित व कार्यक्षम व्हावा ह्या उद्देशानें प्रेरित झालेली आहे. युद्धाविषयीं लोकांमध्यें खऱ्या बातम्यांचा प्रसार करणें, सैन्य भरतीस सहाय करणें, सरकारनें काढलेल्या कर्जास हातभार लावण्याकडे जनतेचें मत वळवणें, अंतर्गत शांतता राखण्याचा प्रयत्न करणें इत्यादि अनेक मार्गांनीं स्वयंसेवकांच्या समित्यांस उपयुक्त कार्य करतां येईल. प्रांतिक गव्हर्नर ह्यासंबंधांत निरनिराळ्या वर्गांच्या पुढाऱ्यांचें सहकार्य, त्यांच्याशीं विचारविनिमय करून घेत आहेत. हिंदुस्थानांतील शांततेच्या संरक्षणाचें महत्त्व किती आहे आणि त्याचे संबंधांत लोकांचें कर्तव्य काय आहे हें अधिक विशद करून सांगण्याची आवश्यकता नाहीं. ह्या गोष्टी सर्वसंमतच आहेत.

---

### युद्धाप्रीत्यर्थ सर्व उत्पादक सामर्थ्यांचा उपयोग

युद्धास लागणाऱ्या सामानाच्या उत्पादनावर आपलें शक्तिसर्वस्व खर्चणें आज ग्रेटब्रिटनला प्राप्त आहे. जर्मनीच्या चढाईचा प्रतिकार करण्यास त्या देशांतील कारखानदार, कामकरी व सामान्य जनता ह्यांस राष्ट्राची सेवा स्वार्थत्यागपूर्वक अधिकांत अधिक कशी करतां येईल हें पहाणें अगत्याचें आहे. ह्याकरितां सैनिकांच्या गरजांस प्राधान्य दिलें जाऊन बिन लढाऊ जनतेच्या रोजच्या रहाणीस कात्री लावली जाणें अपरिहार्य आहे. प्रस्तुत युद्धाची जर्मनीची तयारी पांच वर्षांची असून त्या राष्ट्राचें सर्व जीवित लढाऊ बनवण्यांत आलें आहे. इंग्लंडच्या तयारीस पुरा वेळ न मिळाल्या कारणानें ती जणूं काय प्राथमिक अवस्थेंत आहे. ह्यामुळें जनतेच्या अमर्याद स्वार्थत्यागाची आवश्यकता आज तेथें तीव्र स्वरूपांत उपस्थित झाली आहे. ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडनें पेले—बशा, कांचसामान, चाकू-कात्र्या, पायमोजे, हातमोजे इत्यादि माल कारखानदार व घाऊक व्यापारी ह्यांनीं किरकोळीनें विक्री करणारांस पुरवतां कामा नये असें आज्ञापत्रक गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध केलें आहे, त्याचा हेतु ब्रिटिश राष्ट्राची उत्पादक शक्ति युद्धोपयोगी जिन्नसांच्या पैदाशीवर एकवटणें हाच आहे. विशिष्ट प्रकारच्या यंत्रसामुग्रीचा, सरकारच्या परवानगीवांचून कोणासहि पुरवठा होऊं नये असें नियंत्रण घालण्यांत आलें आहे तेंहि ह्याच उद्देशानें प्रेरित झालें आहे. बाहेरून येणाऱ्या मालावर अशाच प्रकारचे कडक निर्बंध घालण्यांत आले आहेत. निर्गत व्यापार मात्र निर्बंधपणानें चालू दिला जाईल आणि परदेशांत विकावयाच्या पक्क्या मालाच्या उत्पादनास लागणारा कच्चा माल कारखानदारांस मिळण्याची व्यवस्था केली जाईल. वरील योजनेचा परिणाम महागाईंत होण्याची भीति पदार्थांच्या किंमती निश्चित केल्या जात असल्यानें बाळगण्याचें कारण नाहीं असें आश्वासन सरकारच्या वतीनें देण्यांत आलें आहे.

---

### धान्याच्या हिंदी व्यापाऱ्यांची सरकारकडे तक्रार

ग्रेट-ब्रिटनमध्यें आयात व्यापार व मालाच्या किंमती ह्यांचें, नियंत्रण युद्ध परिस्थितीच्या दृष्टीनें कां आवश्यक झालें आहे ह्याचें विवेचन आम्हीं वर केलें आहे. हिंदी व्यापारी वर्गास ह्या आवश्यकतेची जाणीव आहे. तथापि, हिंदुस्थानांतील शेतीच्या

मालाची आयात इंग्लंडमध्यें योग्य प्रमाणांत आणि योग्य किंमतीनें होऊं द्यावी ह्यांत साम्राज्याचें, ह्या देशाच्या बरोबरीनें हित आहे असें त्या वर्गाचें म्हणणें आहे. आळशी व एरंडी ह्या देशांमधून इंग्लंडमध्यें जाईल तिला आर्जेंटाइन व ब्राझिलमधील ह्या मालाच्या प्रमाणांत योग्य भाव दिला जाईल असें आश्वासन हिंदुस्थान सरकारनें साम्राज्य सरकाराकडून मिळवलें होतें, त्याची पूर्तता झालेली नसून अलीकडे भाव उतरवण्यांत आले आहेत ह्या गोष्टीकडे मुंबईच्या मारवाडी चेंबरनें सरकारचें लक्ष वेधलें आहे. तटस्थ राष्ट्रांशीं हिंदुस्थानाचा होणारा व्यापार संपुष्टांत आला असून हिंदी गळिताच्या धान्यांस ग्रेटब्रिटन हेंच मोठें गिऱ्हाइक उरलें आहे. इंग्लंडनें किंमती कमी केल्यानें हिंदी व्यापाराचें नुकसान होत आहे आणि हिंदी शेतकऱ्यांच्या स्थितीवर प्रतिकूल परिणाम होत आहे. तेव्हां हिंदुस्थान सरकारनें ब्रिटिश सरकाराचें ह्या गोष्टीकडे लक्ष वेधून जरूर ती उपाययोजना करून घ्यावी अशी हिंदी व्यापाऱ्यांनीं मागणी केली आहे. हिंदी गव्हाचे बाबतींत मुंबईच्या धान्याचे व्यापाऱ्यांची ह्याच प्रकारची तक्रार व सूचना आहे. ब्रिटिश सरकारानें कॅनडाचा गहू खरेदी केला आहे आणि हिंदी गव्हाची किंमत त्या मानानें खाली गेली आहे. पंजाबमध्यें गव्हाचें मोठें पीक होतें आणि तेथील शेतकऱ्यांचे हितसंबंध ह्या प्रश्नाशी निगडित झाले आहेत. सबब, पंजाबच्या मुख्य प्रधानांनीं ह्या बाबतींत हिंदुस्थान सरकारास विनंति करून ब्रिटिश सरकारास हिंदी गहू विकत घेण्याची आवश्यकता पटवून द्यावी अशी सूचना धान्याच्या मुंबईकर व्यापाऱ्यांनीं केली आहे.

---

### घाबरटपणा करूं नका

" तुमचें रोजचें काम आणि धंदा नेहमीप्रमाणें चालू ठेवा, आपल्या ठेवी बँकांतून काढूं नका आणि नोटा व रोखे ह्यांच्या बद्दला रोकड घेण्याची घाई करूं नका. तुम्हीं सावधगिरीनें वागाल तर धोक्याची कांहीं भीति नाहीं. देशांत गोंधळ माजल्यास तुमचें सोनें व चांदी पुरून किंवा साठवून ठेवली तरी ती बँकांतल्या ठेवी आणि नोटा व रोखे ह्यापेक्षा अधिक सुरक्षित नाहीं. " ह्या शब्दांत महात्मा गांधींनीं लोकांस सध्याच्या गडबडीच्या काळांत कसें वागावें ह्याविषयीं उपदेश केला आहे. प्रत्यक्ष लढणाऱ्या इंग्लंड व फ्रान्स ह्या राष्ट्रांतील जनता धिमेपणानें, शांततेनें व निश्चयानें आपले रोजचे व्यवहार करीत आहे. हिंदुस्थानांत तर गडबडून जाण्याचें लोकांस कांहींच कारण नाहीं. देशांत गोंधळ माजूं नये ह्याविषयीं सर्वांनीं खबरदारी घेतली पाहिजे आणि हिंदी लोक न घाबरतां आपले नित्याचे व्यवहार करतील तर बेबंदशाहीस वावच मिळणार नाहीं. गुंड लोक सध्यासारख्या परिस्थितीचा फायदा घेण्याचा प्रयत्न निःसंशय करतील, पण जनता निर्भय राहिल्यास त्यांचा प्रतिकार व्यवस्थितपणानें करतां येईल. भिऱ्या लोकांमध्येंच गुंडगिरीस अवसर मिळतो, ह्यासाठी सर्वांनीं भीतीस थारा न देतां स्वसंरक्षणाची तयारी ठेवावी. वरील आशयाचा सल्ला महात्मा गांधींनीं " हरिजना "तील एका लेखांत दिला आहे. घाबरटपणानें व्यक्तींचें व राष्ट्राचें अनहितच झाल्यावांचून रहाणार नाहीं आणि त्यानें समाज विस्कळित होऊन बेबंदशाही माजेल. असली आपत्ति कोणासच नको आहे. ती टाळण्याचा उत्कृष्ट मार्ग म्हणजे महात्मा गांधी सांगतात त्याप्रमाणें प्रत्येकानें आपले व्यवहार नेहमींप्रमाणें निर्भयपणानें व शांतवृत्तीनें चालू ठेवणें हाच आहे. बँका, रोखे व नोटा ह्यांत गुंतलेला आपला पैसा पूर्ण सुरक्षित आहे ह्याविषयीं त्यांनीं निःशंक रहावें.

---

### कॉमनवेल्थ कंपनीची साधारण सभा

कॉमनवेल्थ कंपनीची साधारण सभा गेल्या रविवारीं कंपनीच्या नव्या इमारतींत भरली होती. विमा कंपन्यांच्या नव्या कायद्यास अनुसरून कंपनीच्या कारभाराचें वर्ष गेल्या डिसेंबरअखेर पुरें करावें लागलें. ह्यामुळें साधारण सभेपुढें आठ महिन्यांचे हिशेब मांडण्यांत आले. अध्यक्ष, खान बहादूर मेथा, ह्यांनीं आपल्या भाषणांत विमा कायद्यांत कित्येक वादग्रस्त बाबी राहून गेल्यानें कंपन्यांस होणाऱ्या त्रासाचा उल्लेख करून त्याच कारणानें विम्याच्या व्यवहारांत उद्भवलेल्या अडचणींचें दिग्दर्शन केलें आणि सरकारनें ह्या संबंधांत जरूर त्या सुधारणा व दुरुस्त्या कराव्या असें सुचवलें. हिशेब व वृत्तांत सभेनें मंजूर केला. निवृत्त झालेल्या डायरेक्टरांची म्हणजे खा. ब. मेथा, डॉ. नायडू व श्री. पोतदार ह्यांची फेरनिवड झाली आणि श्री. जी. डी. आपटे ह्यांची ऑडिटर म्हणून नेमणूक करण्यांत आली. पॉलिसी होल्डर्सचे डायरेक्टर म्हणून श्री. गोडबोले, डॉ. मुळे व डॉ. फाटक ह्यांची निवड झालेली जाहीर करण्यांत आली. अध्यक्षांचे आभार मानले गेल्यावर सभेचें काम समाप्त झालें. विमा कंपन्यांच्या नवीन कायद्यानें अडचणी उत्पन्न केल्या असल्या तरी कॉमनवेल्थमध्यें त्यांस तोंड देऊन आपला कारभार यशस्वी व प्रगतिपर अशा रीतीनें चालवण्याचें भरपूर सामर्थ्य आहे ही गोष्ट कंपनीच्या डायरेक्टरांचे वृत्तांतांत आणि अध्यक्षांचे भाषणांत प्रामुख्यानें पुढें मांडण्यांत आली. ह्या समाधानकारक परिस्थितीबद्दल कंपनीचें अभिनंदन करणें आवश्यक आहे.

---

### मराठा चेंबर बँकिंगच्या कायद्याचा विचार करणार

हिंदी बँकिंगविषयक कायद्याच्या मसुद्यासंबंधांत चर्चा " अर्थ " मध्यें येत आहे. ह्या विषयाबाबतचे बँकिंगशीं संबंध असलेल्या मंडळींचें मत सरकारकडे पाठवावयाचें आहे. हिंदी व्यापारी मंडळांचें मध्यवर्ती फेडरेशन आहे त्यासहि आपल्यास जोडलेल्या चेंबर्सचा अभिप्राय सरकारास कळवावयाचा आहे. महाराष्ट्रांतील लहानमोठ्या बँकांस नियोजित कायद्यानें अडचणी भासणार आहेत आणि त्यांस बिलाबाबत टीका व सूचना करण्याची आवश्यकता भासणें साहजिक आहे. ह्यासाठी येथील मराठा चेंबरनें आपल्या कार्यकारी मंडळाची विशेष सभा आज दुपारीं भरवण्याचें ठरवलें असून तिच्या चर्चेत भाग घेण्यासाठी आपल्या प्रतिनिधींस मुद्दाम पाठवण्याची विनंति महाराष्ट्रांतील बँकांस केली आहे. नियोजित कायदा सहकारी बँकांस लागू व्हावयाचा नाहीं; तरी त्यांनीं त्याच्या बिलाचा विचार करून त्यांपैकी कित्येक सुधारणा उचलण्याचें ठरवलें आहे. जॉइंट स्टॉक बँकांची सुस्थिति आणि त्यांची प्रगति व विस्तार ह्यांवर नियोजित कायद्याचे बरे-वाईट परिणाम व्हावयाचे असल्यानें त्यांनीं बँकिंगच्या बिलाचा काळजीपूर्वक विचार करण्याचें महत्त्व किती आहे हें सांगण्याचें कारण नाहीं. मराठा चेंबरनें त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींशीं ह्या विषयाबाबत चर्चा करण्याचें ठरवलें आहे ही गोष्ट यथोचित आहे. ह्या चर्चेच्या प्रसंगानें आपापल्या परिस्थितीचा पद्धतशीर रीतीनें विचार करण्याची संधि बँकांस आयतीच मिळणार आहे, तिचा फायदा त्यांनीं अवश्य घेतला पाहिजे.

---

## हिंदी बँकांचा योजिलेला कायदा

### मुख्य कलमांची छाननी

### ( २ )

नियोजित हिंदी बँकांविषयींच्या कायद्याच्या मसुद्यांतील ७ व्या कलमावरील टीकेचें विवेचन मागच्या लेखांत आम्हीं केलें आहे. बँकांचें भरलेलें भाग-भांडवल किमान एक लक्ष रुपये असलें पाहिजे आणि मोठ्या वसतीच्या शहरांत २ लाख व मुंबई सारख्या शहरांत तें ५ लाख असलें पाहिजे, ह्या आशयाची त्या कलमांत तरतूद आहे, ती अनावश्यक आणि निरर्थक आहे अशी त्याविरुद्ध तक्रार आहे. बँकांच्या विस्ताराच्या मार्गांत हें कलम अडथळा आणील हा तिच्यामध्यें मुद्दा आहे. लहान आकाराच्या बँकांच्या उपयुक्त कार्याचा विस्तार मर्यादित करण्यांत ७ व्या कलमाचा परिणाम होईल आणि उलट, काटकरीनें कारभार करणाऱ्या असल्या संस्थांस उत्तेजन देणें आवश्यक आहे असें मत त्या संबंधांत व्यक्त करण्यांत आलें आहे. प्रस्तुत प्रश्नाचे बाबतींत कित्येक विधायक सूचना करण्यांत आल्या आहेत, त्यांचा उल्लेख येथें करणें जरूर आहे. निरनिराळ्या आकाराच्या शहरांतील बँका व त्यांच्या शाखा ह्यांचें भाग-भांडवल अमुक भरलेल्या रकमेइतकें असलेंच पाहिजे, ह्या निर्बंधाचा ठेवीदारांचें रक्षण होण्यास उपयोग व्हावयाचा नाहीं; ह्याच्या ऐवजी भांडवल व ठेवी ह्यांच्या रकमांचें परस्परप्रमाण निश्चित केलें जावें अशी एक सूचना आहे. भरलेल्या भांडवलाच्या अमुक पटींपर्यंतच बँकेनें कर्जे द्यावीं असा निर्बंध घातला गेल्यास भरमसाट व्यवहारांस आळा बसून ठेवीदारांच्या हिताचें योग्य संरक्षण होईल हें ह्या सूचनेचें समर्थन आहे. कोणत्याहि बँकेस परप्रांतांत व्यवहार करावयाचा असल्यास तिचें एकूण किमान भाग-भांडवल वीस लक्ष रुपये असलें पाहिजे ह्या बिलांतील अटीस उद्देशून अशी टीका करण्यांत आली आहे कीं, असली मर्यादा निष्कारण जाचक व प्रतिबंधक होणार असल्यानें ती दूर केली जावी; कारण वीस लक्ष रुपये भांडवलाची बँक धोक्याचे व्यवहार करणार नाहीं असें सांगतां येणार नाहीं. ह्या संबंधांत दुसरी एक योजना सुचवण्यांत आली आहे. विमाकंपन्यांप्रमाणें बँकांनीं आपल्या शाखांच्या ठराविक प्रमाणांत सरकारी रोखे रिझर्व्ह बँकेकडे ठेवण्याची अट घालण्यांत यावी आणि असें झालें असतां लटपटित बँकांस वाटेल तशा शाखा किंवा कचेऱ्या काढतां यावयाच्या नाहींत.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, रिझर्व्ह बँकेनें सुचवलेल्या भाग-भांडवलाच्या मर्यादा टीकाकारांस मान्य नाहींत. ह्या नियंत्रणाचा अपेक्षेप्रमाणें उपयोग न होतां तो बँकिंगच्या विस्तारास अडथळा मात्र करील, म्हणून ठेवीदारांच्या संरक्षणासाठीं दुसरी एखादी योजना अंमलांत आली पाहिजे आणि सबब ज्या मर्यादेच्या योगानें बँकेनें द्यावयाच्या कर्जांवर योग्य बंधन पडेल अशीच मर्यादा घालण्यांत यावी अशी विधायक सूचना करण्यांत आली आहे. भरलेलें भांडवल आणि ठेवींची रकम ह्यांचें प्रमाण ठरवण्यांत यावें आणि बँकांनीं शाखांगणिक सरकारी रोखे रिझर्व्ह बँकेपाशी ठेवावे अशा योजना प्रस्तुत प्रकरणीं पुढें मांडण्यांत आल्या आहेत, त्यांचा विचार होणें आवश्यक आहे. अलीकडे बँका बुडाल्या किंवा घोटाळ्यांत आल्या, त्यांच्या कारणांची छाननी होऊन रिझर्व्ह बँकेनें सुचवलेल्या व्यवस्थेचा ती दूर करण्याकडे कितीसा उपयोग होईल हें पहावें लागेल. रोग एक आणि औषध दुसरेंच असें होतां कामा नये; नाहीं तर बँकांवर निर्बंध तेवढे वसतील आणि त्यांच्या गैरव्यवस्थेचें मूळ तसेंच शिल्लक राहील. ठेवीदारांच्या पैशाची सुरक्षितता ही पहिल्या प्रतीच्या महत्त्वाची गोष्ट आहे हें तत्त्व सर्वमान्य आहे. त्यास व्यवहारांत मूर्तस्वरूप कसें द्यावयाचें हाच प्रश्न येथें आहे. भागीदारांनीं बँकेच्या व्यवहारांत किती भांडवल घातलें आहे आणि केवढी सांपत्तिक जबाबदारी उचलली आहे हा विचारहि महत्वाचा आहे. ह्या भांडवलाचा आणि निरनिराळ्या रिझर्व्हसचा आकार केवढा आहे यावर जनतेचा बँकेवरील विश्वास अवलंबून रहाणें स्वाभाविक आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. भरलेल्या भांडवलाच्या रकमेस एवढें महत्त्व देण्यांत येत आहे त्याचें रहस्य दृष्टीआड होऊं देतां कामा नये. मुंबई, कलकत्ता इत्यादि शहरांत बाहेरील एखाद्या बँकेस शाखा काढावाची असतां पांच लक्ष रुपयांचें भांडवल असलें पाहिजे ही अट निष्कारण जाचक आहे असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं. मध्यम आकाराच्या लहान शहरांतील बँकांस व्यवहाराच्या सोयीसाठीं प्रांताच्या राजधानीच्या शहरांत कचेरी उघडणें आवश्यक वाटतें. त्यांस कायद्याच्या नियंत्रणानें अडथळा आणणें श्रेयस्कर नाहीं. योग्य सावधगिरी न बाळगतां बँका आपलें व्यवहारक्षेत्र भरमसाट वाढवूं लागल्यास त्यांच्या ह्या कृत्यास आळा घालणें अगत्याचें आहे हें सामान्यतः मान्य होण्यासारखें आहे. वरील सर्व बाबतींत व्यावहारिक रीत्या उपयुक्त व परिणामकारक मर्यादा कोणत्या हें ठरवणें सोपें नसलें तरी आवश्यक आहे हें खचित. कच्च्या व अपुऱ्या पायाच्या बँकांस मोठ्या इमारतीचा दिखाऊ भपका करून जनतेच्या डोळ्यांत धूळ फेकतां येऊं नये हा नियोजित कायद्याचा उद्देश आहे आणि तो योग्य आहे. अशा संस्थांपासून लोकांचें संरक्षण करणें आवश्यक आहे ह्यांतहि मतभेद होण्याचें कारण नाहीं. आम्हीं वर म्हटल्याप्रमाणें रोगाचें बिनचूक निदान होऊन उपाययोजना परिणामकारक झाली पाहिजे ही मुख्याची गोष्ट आहे. सामान्य जनतेचें हित व्यक्तींच्या किंवा गटांच्या हितापेक्षां अधिक महत्त्वाचें आहे. बँकांविषयींच्या नियोजित बिलावर येणाऱ्या आक्षेपांचा विचार ह्या व्यापक दृष्टीनें झाला पाहिजे. ह्यासाठींच आम्हीं ह्या लेखांत निरनिराळ्या प्रकारची टीका व भिन्नभिन्न विचारसरणी ह्यांचा सारांश दिला आहे आणि तो विचारप्रवर्तक होईल अशी आशा आहे. बिलाच्या महत्त्वाच्या इतर कलमांचें विवेचन पुढच्या अंकांत येईल.

### ट्रस्ट ऑफ इंडिया अॅशुअरन्स कंपनी

पुणें येथील दी ट्रस्ट ऑफ इंडिया अॅशुअरन्स कं. लि. चे भागिदारांची ५ वी वार्षिक साधारण सभा रविवार तां. १६ जून १९४० रोजीं सायंकाळीं ५॥ वाजतां कंपनीचे मुख्य कचेरींत भरणार आहे. विषयः—वार्षिक ताळेबंद व अहवालवाचन.

ह्याच कंपनीच्या विमेदारांची ३ री सभा कंपनीच्या मुख्य कचेरींत रविवार तां. १६ जून १९४० रोजीं दुपारीं ४॥ वाजतां भरणार आहे.

### शेतीविषयक संशोधनावर खर्च

ब्रिटिश हिंदुस्थानांत शेतीविषयक शास्त्रीय संशोधनाप्रीत्यर्थ १९३८-३९ सालीं सुमारें ११½ लक्ष रुपये खर्च झाले. त्याच वर्षी ग्रेट-ब्रिटनमध्यें त्याच कामासाठीं ८० लक्ष रुपये खर्ची पडले.

## ब्रिटिश हुंडणावळ

ब्रिटिश चलनाचा परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर अमेरिकन डॉलर्स व फ्रेंच फ्रँक्स ह्या चलनांत निश्चित केलेला असून तो आतांपर्यंत स्थिर राखण्यांत आला आहे. ग्रेटब्रिटनच्या परराष्ट्रीय व्यापारांत निघणाऱ्या हुंड्यांची देवघेव सरकारी नियंत्रणाखाली चालत असल्यानें हुंडणावळीच्या दरांत होणारी चलबिचल बंद झाली आहे. तथापि, हुंड्यांचे कांहीं व्यवहार सरकारच्या नियंत्रणक्षेत्राच्या बाहेर चालू दिले जात असत आणि ह्या अनियंत्रित हुंडीबाजारांत ब्रिटिश स्टर्लिंगच्या दरांत घट व चढउतार होत असे. ह्या रीतीनें हुंड्यांचे नियंत्रित व अनियंत्रित असे दुहेरी व्यवहार चालून एकाच वेळीं त्यांचे दोन दर प्रचलित रहात. ह्या दुहेरी हुंडणावळीच्या गोढबंगालाचें रहस्य आम्हीं " अर्था "मध्यें मागें स्पष्ट करून दाखवलें होतें. हुंडणावळीच्या आपल्या नियंत्रणास असलेला अपवाद काढून टाकण्याचें ब्रिटिश सरकारनें आतां ठरवलें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. युद्धाच्या प्रारंभापासून स्टर्लिंग-डॉलर हुंडणावळ ज्या दरानें स्थिर राहिली आहे त्यामध्यें बदल करण्याचा सरकारचा विचार नाहीं. हा दर एका पौंडास सुमारें ४ डॉलर्स असा आहे. खुल्या हुंडीबाजारांत तो पौंडास प्रतिकूल होऊन डॉलरचें मोल वाढवणारा आहे. पौंडास मिळतील तितके डॉलर घेऊन व्यवहार करावयाचे अशी ह्या अनियंत्रित बाजारांतली वृत्ति असल्यामुळें हुंडणावळ अस्थिर रहाते एवढेंच नाहीं तर ती पौंडास डॉलरच्या मानानें खालीं खेचते. सरकारी नियंत्रित हुंडणावळ १ पौंड = ४ डॉलर्स आहे आणि खुल्या बाजारांतील हुंडीचा दर १ पौंड = ३½ डॉलर्स आहे असें समजून ह्याचा आयात–निर्गत व्यापारावर काय परिणाम होतो तें पाहूं. इंग्लंडमध्यें बाहेरून येणाऱ्या मालास दुसऱ्या दरानें पहिल्याच्या मानानें अधिक पौंड द्यावे लागतील ( कारण प्रत्येक पौंडास कमी डॉलर्स मिळतात ) आणि तो माल महाग पडेल. निर्गत मालाची किंमतीची परिस्थिति ह्याच्या उलट होईल. दुसऱ्या दरानें एक पौंड किंमतीच्या मालास कमी डॉलर मिळून तो स्वस्त विकावा लागेल. म्हणजे परदेशी मालास अधिक किंमत द्यावयाची व स्वदेशी मालास कमी किंमत स्वीकारावयाची असा हा नुकसानीचा प्रकार आहे. ह्या कारणास्तव ब्रिटिश सरकारनें असें ठरविलें आहे कीं परराष्ट्रीय व्यापाराचे सर्व व्यवहार नियंत्रित व निश्चित दरानेंच झाले पाहिजेत आणि हुंड्यांचा खुला बाजार बंद राहील.

वरील धोरण यशस्वी व्हावें म्हणून खालीलप्रमाणें व्यवस्था करण्यांत आली आहे. पौंड स्टर्लिंग आणि फ्रँक ह्यांच्या क्षेत्राबाहेर रहाणाऱ्या लोकांस आपल्या मालकीचे रोखे इंग्लंडमध्यें विकूं दिले जाणार नाहींत. ह्या लोकांस इंग्लंडमधला आपला पैसा बाहेर न्यावयाचा असतां ते मिळतील त्या दरानें पौंडाच्या मोबदल्यांत डॉलर्स घेत असत आणि हा धंदा करणारे अमेरिकन त्यांस ह्या व्यवहारांत मदत करीत. ब्रिटिश सरकार आतां असल्या व्यवहारांना परवाना देणार नाहीं. अमेरिका व स्वित्सर्लंड ह्या देशांस होणाऱ्या निर्गत व्यापारांत निघणाऱ्या हुंड्यांची किंमत पौंडांत नियमित दरानें किंवा डॉलर्स व स्विस फ्रँक्समध्येंच दिली पाहिजे असा नियम करण्यांत आला आहे. स्टर्लिंग व डॉलर ह्यांच्या क्षेत्राबाहेरील देशांशीं होणाऱ्या व्यापारांतील हुंड्यांची देणी-घेणी सरकारच्या नियंत्रणाखाली व ठराविक दरानें झालीं पाहिजेत असेंहि ठरवण्यांत आलें आहे. बेल्जम, हॉलंडच्या वसाहती आणि मध्यम व दक्षिण अमेरिकेंतील देश ह्यांच्याशीं हुंडणावळीच्या बाबतींत मागें केलेले करार रद्द करण्यांत येत असून ग्रेटब्रिटनची परराष्ट्रीय व्यापारांतली देवघेव सरकारी नियंत्रणाखाली चालेल अशी व्यवस्था होत आहे. हुंडणावळीच्या दराचें स्थैर्य वरील धोरणानें उत्पन्न होईल तें इंग्लंड आणि त्याच्याशीं व्यापार करणाऱ्या सर्व देशांस सारखेंच सोयीचें व हितावह होणार आहे. ब्रिटिश निर्गत व्यापारांत मालाची भरपूर किंमत आयात मालाच्या स्वस्त मोबदल्यांत किंवा युद्धोपयोगी मालाचें परराष्ट्रीय देणें भागवण्यांत मिळूं शकेल हा वरील योजनेचा इंग्लंडला फायदा आहे. ग्रेटब्रिटनचा साम्राज्याशीं आणि इजिप्त, सुदान व इराक ह्या देशांशीं व्यापार स्टर्लिंगच्या आधारानेंच चालत आहे ह्यामुळें त्यांचे संबंधांत कांहींच अडचण नाहीं. कॅनडाशीं स्वतंत्र व्यवस्था अस्तित्वांत असून ती समाधानकारक आहे. परराष्ट्रीय हुंडणावळीच्या व्यवहारांत अनियंत्रित बाजार चालू देण्याविरुद्ध टीका मागें करण्यांत आली होती आणि तो बंद केला जावा अशी सूचनाहि केली जात होती. त्यावेळीं सरकारी धोरण बदलण्याची विशेष आवश्यकता आहे असें ब्रिटिश फडनविसांस वाटलें नाहीं. परंतु आतां परराष्ट्रीय हुंडणावळीचें नियंत्रण अबाधित व अपवादरहित करण्याचें महत्त्व त्यांस पटलें आहे. आयात निर्गत व्यापारांतलीं देणींघेणीं एकसूत्री होणें युद्धव्यवस्थेच्या कार्यक्षमतेच्या दृष्टीनें निर्विवाद आहे.


## FERGUSSON COLLEGE, POONA.

Opens on 20th June 1940. Students should apply to the Principal in time for admission ( both to the classes and to Hostel ) on prescribed forms with the necessary fee. The accommodation in the Women's hostel is now increased. Details will be found in the prospectus supplied free on request. Admission will be granted from 6th June on working days ( 12 noon to 3 p. m. )

The Vasanji Laxmidas Scholarship is available to a poor deserving Hindu ( preferably a Bhatia ).

G. S. MAHAJANI.
Principal.

## Deccan Institute of Commerce Poona

( Recognised by Government )

Opens for the 1940–41 Session on Tuesday the 25th June 1940. Students admitted for L. C. C., G. C. C. and D. Com. ( I. M C ) Examinations in Accountancy, Banking, Insurance, Secretarial Work and Practice, Shorthand, Typewriting etc. Efficient and qualified staff. Prospectus free on application to :

Secretary,

592/3 Budhwar Peth,
Opp. New English School,
Poona.

## अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

Raviwar Peth, Saraff Bazar,

POONA CITY.

लेखक — अत्रे.

# अर्धांगी

दिग्दर्शक - विनायक

(वेस्टर्न इंडिया थिएटर्स लि. चे (खास व्यवस्थेखालील) **पुणें मिनर्व्हांत** पुणें-फोन ३९८ **६ वा आठवडा**

लेखक—आचार्य अत्रे, दिग्दर्शक—विनायक, छायालेखक—पांडुरंग नाईक.

भूमिकाः—विनायक, लीला चिटणीस, मीनाक्षी, साळवी, मालवणकर, सौ. वसिष्ठ, कु. देशपांडे, आणि बाबुराव पेंढारकर

# BHARAT

## Insurance Co., Ltd.

**COMPLETES IN 1939**

SOLID, SOUND, FRESH BUSINESS of

**OVER RUPEES**

**2 CRORES 8 LAKHS**

UNIVERSALLY RECOGNISED AS

A Leader among Indian Life Offices

*Previous rates of Bonus maintained as a result of the valuation for the quinquennium ended 31st Dec. 1938*

**Rs. 22-8** for Whole-Life Policies

**Rs. 17-8** for Endowment Policies

*Chairman:* SETH RAM KRISHNA DALMIA

*Director-in-Charge:* RAJENDRA KUMAR JAIN

*BRANCHES*

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Agra | Bangalore | Delhi | Lahore | Nagapur | Rawalpindi |
| Ahmedabad | Barisal | Ernakulam | Lucknow | Najibabad | Secunderabad |
| Ajmer | Bombay | Gauhati | Madras | Patna | Shillong |
| Allahabad | Calcutta | Indore | Madura | Peshawar | Sialkot |
| Ambala | Colombo (Ceylon) | Jalpaiguri | Multan | Poona | Sukkur |
| Amritsar | Dacca | Jammu | Muzaffarpur | Rajmundry | Surat |
| Asansol | Dehra Dun | Karachi | Nairobi (E. Africa) | Rangoon (Burma) | Karwar |

Head Office: LAHORE

## पुण्यांतील उद्योग-दिन

पुणें येथें शनिवार ता. १ जून या दिवशीं झारापकर टेलरिंग कॉलेजच्या सभागृहांत उद्योगमंडळातर्फे श्री. रामभाऊ अभ्यंकर यांच्या अध्यक्षतेखालीं उद्योगदिन साजरा करण्यांत आला. त्यावेळीं श्री. आत्माराम रावजी भट, एम्. कॉम्. यांचें 'महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीसंबंधीं कांहीं प्रश्न' या विषयावर भाषण झालें. ते म्हणालेः--

### कारखान्यांचें अपुरें भांडवल

"महाराष्ट्रीय उद्योगधंद्यांची वाढ होण्याच्या मार्गांत ज्या अनेक अडचणी आहेत त्यांतील प्रमुख अडचण पुरेशा भांडवल-पुरवठ्याचा अभाव ही आहे. कारखानदारीचें क्षेत्र महाराष्ट्रीयांना नवीन असल्यानें आर्थिक दृष्ट्या धंदा जास्तींत जास्त फायदेशीर होण्याच्या दृष्टीनें त्यांचा आकार केवढा असावा याची नीट कल्पना त्यांना आली नाहीं. प्राथमिक अदमास चुकीचे ठरले. त्यामुळें जमलेलेंच नव्हे तर संकल्पित भांडवलच अपुरें ठरूं लागलें. महाराष्ट्रांतील धंद्यांना घसघशीत फायदा न होण्याचीं जीं थोडीं महत्त्वाचीं कारणें आहेत त्यांतील हें एक कारण आहे. ज्यांनीं ज्यांनीं या कंपन्यांचे शेअर घेतले ते डिव्हिडंड मिळत नाहीं म्हणून टाहो फोडूं लागले व त्याचा परिणाम महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रांत अगदीं बाल्यावस्थेंत असतांना कारखान्यांचे शेअर कमी खपूं लागण्यांत झाला आहे.

"महाराष्ट्रीयांना औद्योगिक क्षेत्रांत पुढें यावयाचें असेल तर त्यांनीं आपला कांहीं पैसा औद्योगिक प्रगतीची टोलजंग इमारत बांधण्याकरितां तिचा पाया भरून काढण्यांत व्यतीत केला पाहिजे. ज्या ज्या महाराष्ट्रीयांजवळ कमी-अधिक रक्कम शिल्लक आहे त्यानें त्यांतील किमान दहा ते वीस टक्के चांगल्या नि आशादायी उद्योगधंद्याच्या शेअर्समध्यें, तीस टक्के सुस्थित धंद्यांजवळ ठेव म्हणून व ठरलेले पन्नास टक्के विश्वसनीय महाराष्ट्रीय बँकांत ठेव म्हणून ठेवले पाहिजेत. असें होईल तरच महाराष्ट्रीय उद्योग-धंद्यांचा भांडवलाचा प्रश्न सुटेल.

"महाराष्ट्रांतील कारखान्यांना भांडवलाइतकीच जर दुसरी कोणती गरज असेल तर मालविक्रीच्या व्यवस्थेची. महाराष्ट्रीयांनीं सचोटीनें परंतु फायद्याकडे दृष्टि ठेवून व्यवहार केला पाहिजे. साहसी वृत्ति ठेवून थोडाबहुत पैसा बुडला तरी बेहेत्तर, परंतु पुनः पुनः उद्योग करून कारखाने यशस्वी करीन असा हिय्या केला पाहिजे; कारखान्याची तनमनधनानें भक्ति केली पाहिजे. एवढें केलें तर महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रांत पुढारलेल्या प्रांतांची बरोबरी करील.

"युरोपांतील महायुद्धामुळें सरकारनें अनेक वस्तूंच्या आयातीचें नियंत्रण केलें आहे. व ज्यांच्याजवळ यंत्रसामुग्री पुरेशी आहे व ज्यांना लागणारा कच्चा माल हिंदुस्थानांत मिळतो अशा उद्योग-धंद्यांना उन्नतीची महापर्वणी आली आहे. यावेळीं महाराष्ट्रीय धनिकांनीं महाराष्ट्रांतील कारखान्यांना उदार हातानें भांडवलाची मदत केली पाहिजे."

समारोप करतांना अध्यक्ष श्री. रामभाऊ अभ्यंकर म्हणालेः--"आम्ही महाराष्ट्रीय बुद्धिमान नि चतुर आहों असें समजतों. इतर अनेक क्षेत्रांत महाराष्ट्रीयांचें तेज पडलें असलें तरी पोटापाण्याचा मुख्य प्रश्न त्यांना सोडवितां आलेला नाहीं. इंग्रजांनीं व्यापारी भूमिकेवरून हिंदुस्थानचें राज्य कमावलें. ही गोष्ट ध्यानांत घेऊन सरकारी नोकरी, वैद्यकी, वकिली, शिक्षकी या क्षेत्रांकडे प्रथम लक्ष देण्याऐवजीं इंग्रजांच्या पावलांवर पाऊल टाकून व्यापारी क्षेत्र काबीज करण्याची दिशा आमच्या अव्वल इंग्रजींतल्या पुढाऱ्यांनीं महाराष्ट्रीय तरुणांना दाखवावयास पाहिजे होती ती दाखविली नाहीं म्हणून महाराष्ट्र आज आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे."


# पूर्व खानदेश
# सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.
जळगांव.

(स्थापना : मे १९१९) रु.

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल. ...... | १०,००,०००।- |
| जमा झालेलें शेअर भांडवल...... | ४,६९,०००।- |
| रिझर्व्ह फंड. ...... | २,९८,०००।- |
| इतर फंडस. ...... | ३,७७,०००।- |
| खेळतें भांडवल (३०-६-३९) ...... | ५७,८९,०००।- |

डिव्हिडंड पांच टक्के (सहा वर्षांपासून)

हेड ऑफिस :—सेंट्रल को-आपरेटिव्ह बँक बिल्डिंग, नवी पेठ, जळगांव.

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सर्व भागांत शाखा व पे-ऑफिसेस चांगल्या रीतीनें चालू आहेत.

—: बँकर्स :—

मुंबई : मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. मुंबई.
जळगांव : इंपीरिअल बँक ऑफ इंडिया.
अहमदाबाद : बँक ऑफ इंडिया लि.
नागपूर : सी. पी. अँड बेरार प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

बँकेचे हिशेब त्रैमासिक रजिस्टर्ड अकौंटंटचे फर्मकडून व वार्षिक सरकारी स्पेशल ऑडिटराकडून तपासले जातात.

चालू ठेवीवर : अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज ठेवीवर : दोन टक्के व्याज देण्यांत येतें.
मुदतीच्या ठेवीवर : तीन ते साडे चार टक्के व्याज मुदतीप्रमाणें देण्यांत येतें.

ठेवीदाराचे व्यवहार सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत केले जातात. बँकेशीं व्यवहार करणारांचे सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत योजना करण्यांत येते.

सर्व प्रकारच्या मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो. ठेवींवरील व्याजाचे दर अगर व्यवहाराच्या अटी समक्ष अगर पत्रद्वारें कळविण्यांत येतील.

को-ऑपरेटिव्ह संस्थांना मुदतीच्या ठेवींवर इतरांपेक्षा अर्धा टक्का व्याज जास्त देण्यांत येतें.

बी. डी. देशमुख,
चेअरमन.



# बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.

☞ किं. १ रु. ८ आणे ☜

१ रु. १० आ. ९ पै चीं तिकिटें पाठवून मागणी करा.

: लेखक :

प्रो. प्रा. मो. काळे ◆ श्री. श्री. वा. काळे

बँकिंगविषयक प्रश्नांचें विवेचन करणारें अत्यंत उपयुक्त पुस्तक

"अर्थ" ग्रन्थमाला, : : पुणें ४.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) | ३% |
| **सरकारी आणि निमसरकारी रोखे** | |
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) ... ... | १०८—४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०५—० |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९१—४ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १००—८ |
| ३% (१९६३–६५) ... ... ... | ८९—१ |
| २½% १९४८–५२ ... ... ... | ९४–१५ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) ... | १००—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | १००—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५१–६१). ... ... | १०७—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... ... | ११७—० |


## The Willingdon College, Sangli.

Reopens for the new academic year on the 20th June. Registration of names will commence on the 6th June. The college provides for both Arts and Science Courses in the first two years, for B. A. Degree courses, Pass and Honours, and for post-graduate instruction. About a hundred seats are available in the college Hostels. Healthy surroundings, inexpensiveness and efficiency are the special features of the college.

The tuition fees are Rs. 60 per term, and the room rent per term is Rs. 12 for a double room and Rs. 15 for a single room. Boarding charges come to about Rs. 12 p. m. Further information can be had on application.

Separate accommodation for lady students is available in the Sakhubai Gokhale Hostel on the college premises.

V. K. GOKAK,
Principal.

The Sir Cusrow Wadia Institute of Electrical Technology,

## Nowrosjee Wadia College, Poona.

The Sir Cusrow Wadia Institute of Electrical Technology provides adequate theoretical and practical training in all important branches of Electro Technology.

The Institute has a Mechanical Workshop and fully equipped Electrical and Radio Laboratories and a highly qualified Staff. A feature of the course is three months' works training at the end of each year. The Institute teaches the following courses:–

(1) A three years' Diploma Course for Matriculates;

(2) An apprentice course for persons with enough knowledge of English;

(3) A postgraduate course for those who have taken their B. Sc. with Physics and Mathematics.

For detailed information regarding admission, fees etc. ask for Prospectus (sent gratis).

स्पृहणीय यश

**बोनसचे दरांत २० टक्के वाढ**

तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक–दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

## दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स

कंपनी लि० पुणें

लिहा अगर समक्ष भेटा.

श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

## रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे

★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस
★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें

सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.

| रजिस्टर्ड ऑफिस: | बिझिनेस ऑफिस: |
|---|---|
| ७५४ शुक्रवार, पुणें २ | ९९२A सदाशिव, पुणें २ |

न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एस्सी.




स्त्रियांचा आजार म्हणजे मुख्यतः विटाळ-दोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

धी इंडो फॉरिन एजन्सीज. (डि. नं. ६)
२५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.




एजंटः—

**महादेव गोविंद कुलकर्णी**

किराणा व भुसार मालाचे व्यापारी

७८६ सदाशिव, पुणें शहर.

---

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन

**जर्निमन टेलर व्हा.**

मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष

**पराडकर टेलर्स ॲकेडिमी,** ६७२ सदाशिव, पुणें.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

---

—ॐ सत्यमेवजयते—

सुकामेवा एक आणा पाकीट

**लोणच्याचें साहित्य**

म्हणजे

निवडक सर्व किराणा

मोहरीची डाळ, मोहरी भुकणी, मोहरी तेल (पॅक बाटल्या), मेथी भरडा, स्पेशल हिंग, तांबडें लाल (भडक) तिखट भुकणी इत्यादि खात्रीचा माल तयार आहे.

लोणच्याचा तयार मसाला पूड तयार आहे!

**—: दत्तात्रय नारायण हेजीब :—**

किराणा व सुकामेवा व्यापारी, २० शुक्रवार पेठ, पुणें २

लोणचीं, पापड, मसाले, मेतकूट सदैव तयार असतात.

---

**महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

**तयार कपड्याचे व्यापारी**

बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा प. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, प. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.